**<u>सं.फौ.ख.क्र.७१३/२०२१</u>**
शासन–वि–किरण रांधवन.
नि.क्र. १४ लगत.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – हनुमंत बाळू कांबळे,
वय – ४५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार– रावणगाव, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. दि. ०९.०९.२०२१ रोजी कुंभार पोलीसांनी मला रावणगाव चौकी येथे बोलावले होते. मी पोलीसांसोबत घटनास्थळ पंचनामा करण्याकरिता पुणे सोलापूर महामार्गावर गेलो नव्हतो. आता मला दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.क्र.१ वरील सही माझी आहे, परंतु त्यातील मजकुर मला माहिती नाही. फक्त सहीस **<u>नि.१८</u>** देण्यात येते. तसेच दि. १४.०९.२०२१ रोजी पोलीसांनी मला गाडीचा पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलावले नव्हते. आता मला दाखविण्यात आलेल्या जप्ती पंचनाम्यावरील अ.क्र.१ वरील सही माझी आहे, परंतु त्यातील मजकुर मला माहिती नाही. फक्त सहीस **<u>नि.१९</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास पाठिंबा देत नसल्याचे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नमुद केले व साक्षीदारास उलटतपासणी सदृष्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, कुंभार पोलीसांनी मला आणि दुसरे पंच रमेश गावडे यांना सोलापूर पुणे हायवेवर घटनास्थळ पंचनामा करण्याकरिता बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ हे रावणगाव हद्दीत असून फिर्यादी चंद्रभागा आटोळे यांनी दाखविला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाची पाहणी करुन पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा लिहीला व नकाशा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४.०९.२०२१ रोजी रावणगाव चौकीत पोलीसांनी बोलावले आणि माझ्यासमक्ष आरोपीने हजर केलेली एम.एच. ४२ बी.सी. २८३ जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की, त्या गाडीचे पुढील खोपडीचे भागाचे नुकसान झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही पंचनामे माझ्यासमक्ष होऊनदेखील आरोपींना मदत होण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपी गैरहजर. आरोपींचे विधीज्ञ गैरहजर. साक्षीदार हजर असल्याने सरतपास</u>**

**<u>नोंदविण्यात आले आणि उलटतपास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ प्रमाणे सदर साक्षीदाराचा उलटतपास Dispensed With करण्यात येत आहे.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- २५.०८.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.